**ठळक बातम्या**

- संसदेत राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरच्या चर्चेला सुरूवात
- केंद्रीय अर्थसंकल्पात राज्यातल्या रेल्वे प्रकल्पांसाठी सुमारे २३ हजार ८०० कोटी रुपयांची तरतूद असल्याची रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची माहिती
- सुमारे २८ लाख रुपयांचं बक्षीस असलेल्या ४ नक्षलवाद्यांचं आत्मसमर्पण

**आणि**

- महेंद्र गायकवाड आणि शिवराज राक्षे यांच्यावर राज्य कुस्तीगीर परिषदेकडून ३ वर्षांसाठी बंदी

**<><><><><>**

संसदेत आज राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरच्या चर्चेला सुरुवात झाली. लोकसभेत चर्चेला सुरुवात करताना, भाजपा खासदार रामवीर सिंह बिधुरी यांनी नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालच्या सरकारने केलेल्या कामांची आणि लोककल्याणकारी योजनांची माहिती दिली. यावेळी त्यांनी दिल्ली आणि परिसरातल्या रस्त्यांची स्थिती, वायू प्रदूषण आणि सार्वजनिक वाहतूक सुविधामधल्या समस्यांचा मुद्दाही उपस्थित केला.

देशात बेरोजगारीचा प्रश्न अद्यापही कायम असून सरकारला तो सोडवण्यात अपयश आल्याची टीका लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आज केली. सकल राष्ट्रीय उत्पादन १५ पूर्णांक ३ शतांश टक्क्यांवरून १२ पूर्णांक ६ शतांश टक्क्यांपर्यंत घसरलं असून हे गेल्या साठ वर्षांतलं सर्वात कमी उत्पादन आहे, असंही गांधी यावेळी म्हणाले. मेक इन इंडिया ही चांगली कल्पना असूनही तिची

अंमलबजावणी करण्यात सरकार अपयशी ठरलं आहे, अशी टीकाही गांधी यांनी यावेळी केली.

**<><><><><>**

राज्यसभेत चर्चेला सुरुवात करताना भाजपा खासदार किरण चौधरी यांनी शेतकऱ्यांचं उत्पन्न दुप्पट करण्यासाठी सरकारने महत्त्वपूर्ण पावलं उचलल्याचं प्रतिपादन केलं. कृषी क्षेत्रासाठी सरकारने प्रयत्न केल्यानंतरही विरोधी पक्ष सरकारविरुद्ध खोटा प्रचार करत असल्याची टीकाही चौधरी यांनी केली. राज्यसभेतले विरोधी पक्षनेते आणि काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी या चर्चेवेळी बेरोजगारी, महागाई आणि रुपयाची घसरण हे मुद्दे यावेळी उपस्थित केले. दरवर्षी दोन कोटी नोकऱ्या मिळतील, असं आश्वासन सरकारने दिलं होतं, मात्र, अद्यापही ते पूर्ण झालेलं नाही. विविध सरकारी विभागांमध्ये मोठ्या प्रमाणात रिक्त पदं आहेत, मात्र ती भरलेली नाहीत, अशी टीका खरगे यांनी यावेळी केली. तसंच, अनुसूचित जाती आणि जमातींवरच्या कथित अत्याचारांचा मुद्दाही खरगे यांनी राज्यसभेत उपस्थित केला.

**<><><><><>**

प्रधानमंत्री आवास योजनेच्या ग्रामीण भागातल्या दुसऱ्या टप्प्यात आतापर्यंत १६ लाख ८१ हजार ५३१ घरांना मंजुरी देण्यात आली आहे. उर्वरित घरांच्या कामांना गती देण्यासाठी सामाजिक उत्तरदायित्व निधीची मदत घेण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिले. सामाजिक क्षेत्रातील फ्लॅगशिप योजनांचा आढावा घेताना ते बोलत होते. यासोबत आयुष्मान भारत आणि राज्य शासनाची महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना यांचा लाभ राज्यातल्या

रुग्णांना मिळावा, यासाठी नोंदणीच्या कामाला गती द्यावी. तसंच यामधला मानवी हस्तक्षेप कमी करून डिजिटल यंत्रणा सज्ज करण्याचे निर्देशही फडणवीस यांनी यावेळी दिले.

**<><><><><>**

जलसंधारणाच्या जुन्या प्रकल्पांच्या कायमस्वरूपी दुरुस्ती आणि देखभालीकरिता राज्य शासन नवीन धोरण आणणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज ही माहिती दिली. मृद व जल संधारण विभाग आणि विविध संस्था- संघटना यांच्यामध्ये आज तीन सामंजस्य करार करण्यात आले , त्यावेळी ते बोलत होते. आजवर रखडलेले प्रकल्प नवीन धोरणामुळे प्राधान्यानं पूर्ण होतील, तसंच कमी खर्चात अधिक काम पूर्ण होऊन जलसंधारणाचा प्रभावी वापर होईल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला.

नाम फाउंडेशन, टाटा मोटर्स आणि भारतीय जैन संघटनेसोबत आज झालेल्या सामंजस्य करारांमुळे राज्यातल्या जलसंधारण कामामध्ये शेतकऱ्यांचा सहभाग वाढेल, राज्यभरात पाण्याविषयी जनजागृती निर्माण होईल, असंही मुख्यमंत्री म्हणाले.

**<><><><><>**

**देशातल्या** रेल्वेच्या विकास आणि कार्यक्षमता वाढीसाठी अर्थसंकल्पामध्ये २ लाख ५२ हजार २०० कोटी रुपयांची तरतूद आहे. त्यापैकी नवीन रेल्वे मार्गांसाठी ३२ हजार २३५ कोटी रुपये, मार्गिकांच्या नूतनीकरणासाठी २२ हजार ८०० कोटी आणि रेल्वेमार्गाच्या दुपदरीकरणासाठी ३२ हजार कोटींची तरतूद

आहे. १६ हजार २४० कोटींची नवीन रेल्वे मार्गिकांची कामं सुरु आहेत. या आर्थिक वर्षात ५० नव्या नमो भारत गाड्या, १०० नव्या अमृत भारत गाड्या आणि २०० नव्या वंदे भारत गाड्या सुरू करण्याची योजना आहे.

**<><><><><>**

केंद्रीय अर्थसंकल्पात राज्यात रेल्वेसाठी एकंदर २३ हजार ७७८ कोटी रुपयांची विक्रमी तरतूद केल्याची माहिती रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली आहे. राज्यात एकंदर १ लाख ७० हजार कोटी रुपयांचं काम सुरू असल्याचंही त्यांनी वार्ताहर परिषदेत सांगितलं. या रेल्वे प्रकल्पांसाठी राज्य सरकार, केंद्र सरकार आणि भारतीय रिझर्व्ह बँक यांच्यात करार झाला आहे. त्यानुसार या प्रकल्पांमधला राज्याचा वाटा रिझर्व्ह बँक उचलणार आहे, असंही त्यांनी सांगितलं.

अमृत स्थानक योजनेअंतर्गत राज्यातली नवी १३२ स्थानकं विकसित केली जाणार आहेत. गेल्या १० वर्षात राज्यात एकवीसशे किलोमीटर लांबीचे नवे रेल्वेमार्ग तयार करण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली.

**मुंबई**तल्या मुंबई सेंट्रल, वांद्रे, जोगेश्वरी, वसई, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, परळ, लोकमान्य टिळक टर्मिनस, कल्याण, पनवेल या टर्मिनलची क्षमता वाढवण्यात येणार आहे. याशिवाय तुमसर, वडसा, आमगाव, कळमना या स्थानकांत गोदाम सुरू करणार असल्याचं ते म्हणाले.

कोकण रेल्वे मार्गावर दरवर्षी सात ते आठ स्थानकांवर उच्चश्रेणी विश्रामगृह उभारली जातील. ती ताशी ५० रुपये शुल्क देऊन प्रवाशांना वापरता येतील असं कोकण रेल्वेचे अध्यक्ष संतोषकुमार झा यांनी सांगितलं.

**<><><><><>**

सुमारे २८ लाख रुपयांचे बक्षीस असलेल्या ४ नक्षलवाद्यांनी आज गडचिरोली पोलीस आणि केंद्रीय राखीव दलापुढे आत्मसमर्पण केलं. यात एक विभागीय समिती सदस्य, एक एरिया समिती सदस्य आणि दोन दलम सदस्यांचा समावेश आहे. अशोक सडमेक आणि त्याची पत्नी वनिता दोहे, तसंच साधू लिंगू मोहंदा आणि त्याची पत्नी मुन्नी पोदिया कोरसा अशी या नक्षलवाद्यांची नावं आहेत. अशोक १९९१ मध्ये अहेरी दलममध्ये सहभागी झाला. सध्या तो विभागीय समिती सदस्य होता. त्याच्यावर ८२ गुन्हे दाखल असून १६ लाख रुपयांचं बक्षीस सरकारनं जाहीर केले होते.

**<><><><><>**

गडचिरोलीत पोलिसांनी अवघ्या एका दिवसात पोलिस स्टेशन सुरू केलं आहे. मुख्यालयापासून २०० किलोमीटर अंतरावर नेलगुंदामध्ये दीड हजारापेक्षा जास्त पोलिसांनी ही कामगिरी केली आहे. नक्षलवाद्यांचे प्रशिक्षण स्थळ तसंच दोन राज्यांच्या सीमावर्ती क्षेत्रात हा भाग आहे. या कामगिरीबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पोलिसांचं अभिनंदन केलं आहे.

**<><><><><>**

दिव्यांग उमेदवारांना कुठल्याही विशिष्ट निकषाची पूर्तता न करता परीक्षेसाठी लेखनिक सुविधा द्यावी, असे आदेश सर्वोच्च न्यायालयानं आज दिले. यापूर्वी केवळ ४० टक्के दिव्यांगत्व असणाऱ्यांना लेखनिक वापरण्याची मुभा होती. लेखनिकांसाठी असलेला वैधता कालावधी वाढवण्याचे निर्देशही न्यायालयानं दिले.

एका उमेदवारानं दाखल केलेल्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयानं हे निर्देश दिले. २ महिन्यात या सर्व निर्देशांचं पालन करा, असं न्यायालयानं म्हटलंय.

<><><><><>

गुलेन बॅरी सिंड्रोमच्या 38 रुग्णांना उपचारानंतर रुग्णालयातून घरी सोडण्यात आलं. रुग्णसंख्येमध्ये दररोज नऊ ते दहा रुग्णांची वाढ होत असली तरी रुग्ण बरे होण्याचं प्रमाणही वाढतं आहे. जीवरक्षक प्रणालीवर असलेल्या रुग्णांची संख्याही २८ वरून २१ पर्यंत घटली आहे. ४८ रुग्ण अतिदक्षता विभागात उपचार घेत आहेत. आज जीबीएस आजाराच्या नवीन नऊ रुग्णांची नोंद झाली आहे. आता एकंदर रुग्णसंख्या १५८ झाली.

दरम्यान अहिल्यानगरात आज या आजाराचा एक संशयित रुग्ण आढळला. त्याला पुण्यात ससूनमध्ये उपचारासाठी पाठवलं आहे.

<><><><><>

गेल्या एका महिन्यात बीड जिल्ह्यातले १८३ बंदुकीचे परवाने रद्द केल्याची माहिती प्रशासनानं दिली आहे. आठ जणांनी स्वयंप्रेरणेने आपले परवाने परत दिले. जिल्ह्यातले आणखी १२७ परवाने रद्द करण्याची शिफारस पोलिसांनी प्रशासनाला केली आहे.

<><><><><>

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठानं २०२२ आणि २०२३ या वर्षीच्या विशाखा काव्य पुरस्काराची घोषणा आज केली. २०२२ या वर्षाचा पुरस्कार सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या कणकवली इथल्या सरिता पवार यांच्या ‘राखायला हवी

निजखूण’ या काव्यसंग्रहाला जाहीर झाला आहे. तर २०२३ चा पुरस्कार पुण्यातले तान्हाजी बोऱ्हाडे यांच्या ‘जळताना भुई पायतळी’ या काव्यसंग्रहाला जाहीर झाला आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेत गैरवर्तन केल्याबद्दल दोन कुस्तीगीरांवर बंदी घालण्याचा निर्णय राज्य कुस्तीगीर परिषदेनं घेतला आहे. अहिल्यानगर इथं काल या स्पर्धेचा समारोप झाला. महेंद्र गायकवाड आणि शिवराज राक्षे या दोन कुस्तीगीरांनी पंचांशी वाद घातला. राक्षेनं एका पंचाला लाथ मारली तर अंतिम लढतीत महेंद्र गायकवाडने पंचांना शिवीगाळ केली असे आरोप त्यांच्यावर असून पुढची ३ वर्ष त्यांनी कोणत्याही कुस्ती स्पर्धेत भाग घेता येणार नाही.

**//<><><><><>//**